| | | |
|---|---|---|
| सीएनआर नं. | :— | MHLC08-000106-2023 |
| दाखल दिनांक | :— | ११/०९/२०२३ |
| नोंदणी दिनांक | :— | ११/०९/२०२३ |
| निकाल दिनांक | :— | ०१/०६/२०२४ |
| एकूण कालावधी | :— | वर्ष महिना दिवस |
| | | ०० ०८ २१ |

**पीठासन अधिकारी तथा न्यायाधीश, कामगार न्यायालय, रत्नागिरी यांचे न्यायासनासमोर**

**अर्ज (औविअ) क्र. ७२/२०२३**
**ओ—४**

**श्री. प्रविण नारायण गांगुर्डे**
वय — ३१ वर्षे, व्यवसाय —नोकरी,
रा. हरिओम नगर, पिंपळनेर, ता. साक्री, जि. धुळे. .. **अर्जदार**

**विरुध्द**

१. **राज्य परिवहन महामंडळ रत्नागिरी**
**करीता विभाग नियंत्रक,**
कार्यालय — माळनाका, ता. जि. रत्नागिरी .. **सामनेवाला**

**कोरम :—श्रीमती एस. व्ही. इनामदार, पीठासन अधिकारी तथा न्यायाधीश.**

**उपस्थिती :— श्री. व्ही. जे. जोग अर्जदारतर्फे विधिज्ञ.**
**श्री. एम. एम. कदम सामनेवालातर्फे विधिज्ञ.**

# निकालपत्र

**(न्यायदान कक्षात दि. ०१/०६/२०२४ रोजी जाहिर)**

१. सदरचा अर्ज औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३ — सी (२) अन्वये दाखल करण्यात आला आहे.

## अर्जदार यांचे कथन :—

२. अर्जदार हे सामनेवाला आस्थापनेत 'लिपिक टंकलेखक' या पदावर काम करीत आहेत. अर्जदार हे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ अंतर्गत 'कामगार' या व्याख्येमध्ये बसतात. सामनेवाला यांची आस्थापना संबंधित कामगार कायद्यांतर्गत 'उद्योग' या व्याख्येमध्ये बसते. अर्जदार यांनी सामनेवाला महामंडळाचे आदेशानुसार दि. ०८/०५/२०२० ते ३१/१२/२०२० या कोवीड—१९ महामारीच्या कालावधीत महामंडळाने दिलेल्या आदेशानुसार कामावर हजर होवुन नोकरी केली आहे. वरील कालावधीत काम करणा—या सर्व कर्मचा—यांना महाराष्ट्र सरकारतर्फे दररोज रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता देण्याचे जाहीर करण्यात आले होते व त्या अनुषंगाने रा. प. महामंडळातर्फे परिपत्रक क्र. ३३/२०२१ अन्वये कामावर उपस्थित असलेल्या कर्मचा—यांना वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रतिदिन रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता देण्याचे निर्देश महाव्यवस्थापक, मुंबई यांचे कार्यालयाकडुन देण्यात आले होते. तसेच, याबाबत मुंबई येथील मे. उच्च न्यायालय रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ चे कामी मे. उच्च न्यायालयाचे आदेशामध्ये वरील विशेष प्रोत्साहन भत्ता रु. ३००/— सदर केसच्या निकाल तारखेपासुन म्हणजेच दि. ०७/०४/२०२२ पासुन आठ आठवड्यांमध्ये देण्याचे रा. प. महामंडळास आदेश दिले होते. सदरची मुदत दि. ०३/०६/२०२२ रोजी संपली असुन अद्याप सामनेवाला महामंडळातर्फे अर्जदार यांना वरील प्रमाणे विशेष प्रोत्साहन भत्ता देण्यात आलेला नाही.

३. अर्जदार पुढे कथन करतात की, कोरोना साथीच्या काळात दि. ०८/०५/२०२० ते ३१/१२/२०२० पर्यंत अर्जदार यांनी एकुण ११७ दिवस कामावर हजर राहुन काम केले असुन त्या कालावधीतील रु. ३००/— प्रतिदिन प्रमाणे एकुण ११७ दिवसांचे रु. ३५,१००/— विशेष प्रोत्साहन भत्ता

म्हणुन दि. ०३/०६/२०२२ पासुन द. सा. द. शे. १५ टक्के व्याजासह देणेचा आदेश होणे आवश्यक आहे. सदरील विशेष प्रोत्साहन भत्ता मिळण्यासाठी अर्जदार यांनी वकील श्री. व्ही. जे. जोग यांचे मार्फत दि. १०/०७/२०२३ रोजी सामनेवाला यांना नोटीस पाठविली होती. त्यास सामनेवाला यांनी दि. २७/०७/२०२३ रोजी खोडसाळ उत्तर दिले. परंतु, अर्जदार यांची देय रक्कम दिली नाही. सबब, अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले.

**सामनेवाला यांचे कथन असे की** :—

४. सामनेवाला यांनी नि. सी—२ वर म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जाचा विरोध केला. सामनेवाला यांनी कथन केले की, प्रस्तुतचा अर्ज खोटा, खोडसाळ, अयोग्य व बेकायदा आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या मथळ्यामध्ये सामनेवाला म्हणुन राज्य परिवहन महामंडळ, रत्नागिरी असा उल्लेख केलेला आहे. परंतु, सामनेवाला महामंडळाचे पुर्ण नाव महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ असे आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी सामनेवाला यांना त्यांच्या उचित नावानुसार पक्षकार केलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज योग्य पक्षकारांची कमतरता या सदराखाली बाधित आहे. त्यामुळे, तो फेटाळण्यात यावा. तसेच, प्रस्तुत अर्जात अर्जदार यांनी केलेल्या मागण्यांबाबत अर्जदार यांना पुर्वनिर्मित हक्क व अधिकार नाही. वास्तविक अर्जदार हे सदरील मागणी मिळण्यास कशाप्रकारे पात्र असुन त्याबाबत त्यांना पुर्वनिर्मित हक्क व अधिकार कसा आहे हे प्रस्तुत अर्जात अर्जदार यांनी सविस्तर नमुद करणे अपेक्षित होते. मात्र, प्रस्तुत अर्जात अर्जदार यांनी हेतुपुरस्सर मौन बाळगले आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्जाव्दारे केलेली मागणी मिळण्यास अर्जदार पात्र नाहीत. प्रस्तुत अर्ज व त्यातील मागणी सामनेवाला यांना मान्य नाही. त्यामुळे, प्रस्तुत अर्जातील मागणी ही विवादीत असुन सदर मागणीबाबत वाद आहेत.

अर्जदार यांनी त्यांचे वकीलांमार्फत सदर मागणीबाबत पाठविलेल्या नोटीसीस सामनेवाला यांनी उत्तर देवुन अर्जदार यांची मागणी फेटाळली आहे. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ कलम ३३—सी (२) नुसार केलेली मागणी ही विवादीत असेल आणि सदरची मागणी मिळण्यास अर्जदार यांची पात्रता देखील विवादीत असेल तर अशावेळी अर्जदार यांचा अर्ज चालण्यास पात्र नसतो असे स्थापित तत्व आहे. सदर तरतुदीनुसार मे. न्यायालय केवळ अंमलबजावणी करणारे न्यायालय असुन केवळ कोणत्याही निवाड्याने अथवा समझोत्याने ठरविलेल्या रक्कमेची सांख्यिक संगणना करणेबाबत मर्यादीत अधिकार मे. न्यायालयास आहेत. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मे. न्यायालयाचे अधिकार कक्षेबाहेर आहे.

५. सामनेवाला पुढे कथन करतात की, वर नमुद कायद्यानुसार अर्जदार हे 'कामगार' या संज्ञेत मोडतात याबाबत प्रस्तुत अर्जात सोईस्कररित्या मौन बाळगलेले आहे. वास्तविक अर्जदार हे 'कर्मचारी' अथवा 'कामगार' या संज्ञेमध्ये कसे बसतात हे सविस्तरपणे अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक होते. तसेच, अर्जदार यांनी त्यांच्या कामाचे स्वरुप देखील नमुद करणे आवश्यक होते. परंतु, या सर्व महत्वाच्या बाबींकडे अर्जदार यांनी सोईस्कररित्या बगल देवुन मोघम स्वरुपाचा अर्ज केलेला दिसुन येतो. त्यामुळे, मोघमपणे नमुद केलेली कथने कायदेशीरदृष्टया ग्राह्य धरता येणारी नसतात. अर्जदार हे 'कामगार' या संज्ञेत कसे मोडतात हे सिध्द करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची आहे. अर्जदार यांच्या कामाचे स्वरुप पाहता पर्यवेक्षकीय असल्याने ते औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील 'कर्मचारी' अथवा 'कामगार' या व्याख्येमध्ये मोडत नाहीत. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांच्या निवाड्यानुसार कर्मचारी आहे अथवा नाही हे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ कलम ३३—सी(२) अंतर्गत

ठरविता येत नाही. त्यासाठी वेगळ्या तरतुदीनुसार अर्ज करणे व ठरवुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही.

६. अर्जदार यांनी चुकीच्या माहितीआधारे व परिपत्रकांचा व तरतुदींचा चुकीचा अर्थ काढुन चुकीची मागणी केलेली आहे. अर्जदार यांच्या अर्जातील कथनानुसार त्यांना काम करुनही त्यांचे वेतन अथवा भत्ते मिळाले नाहीत अशी त्यांची तक्रार असल्यास वेतन आणि भत्त्यांबाबत स्वतंत्र कायदा The Payment of Wages Act, 1936 हा असुन या कायद्यानुसार त्यांनी प्रथमत: दाद मागणे आवश्यक होते. परंतु, या थेट कायदेशीर तरतुदीस बगल देवुन अर्जदार यांनी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ कलम ३३—सी(२) या तरतुदीचा दुरुपयोग केला आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालणारा नाही. प्रस्तुतचा अर्ज हा त्यातील मागणीचे अवलोकन केले असता मुदतबाह्य असल्याचे दिसुन येते. सदरची मागणी सुमारे ३ वर्षानंतर अर्जदार करत आहेत. अर्जदार यांची मागणी ही त्यांच्या अर्जातील मजकुरावरुन The Payment of Wages Act, 1936 मधील तरतुदींशी निगडीत आहे. सदर कायद्यातील कलम १५ (२) या तरतुदीनुसार एखादा दावा करण्याची मुदत ही १२ महिने निश्चित केलेली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज करण्यास अर्जदार यांना विलंब झालेला दिसुन येतो. मात्र, अर्जदार यांनी विलंबाचे कोणतेही कारण दिलेले नसुन स्वतंत्र विलंब माफी अर्ज देखील दिलेला नाही. यास्तव प्रस्तुतचा अर्ज मुदत बाह्य असल्याने खर्चासह फेटाळण्यात यावा.

७. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज विनाकारण केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी अर्ज दाखल करण्यास काय व कोणते कारण घडले हे स्पष्टपणे नमुद केलेले नाही. कोणताही दावा दाखल करताना दाव्याचे कारण स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक असते. मात्र, अर्जदार यांनी संपुर्ण अर्जात त्यांचे

दाव्याला कोणते कारण घडले हे नमुद केलेले नाही. अर्जदार हे स्वच्छ हाताने न्यायालयामध्ये आलेले नाहीत.

८. शासनाने प्रसारित केलेल्या निर्देशानुसार रेड झोन मधील कारखान्यांचे कामकाज करताना कर्मचा—यांची उपस्थिती ३३ टक्के पर्यंत मर्यादित केलेली होती. परंतु, ऑरेंज व ग्रीन झोन मधील कारखान्यांमधील कर्मचा—यांच्या संख्येबाबत काही नमुद केलेले नाही. त्यामुळे ऑरेंज व ग्रीन मध्ये असणा—या विभागीय कार्यशाळेत १०० टक्के उपस्थिती सह कार्यशाळा सुरु करण्यासाठी स्थानिक प्रशासनाची मान्यता घेवुन व त्या ठिकाणी कुठल्या कर्मचा—यांना कोणत्या दिवशी बोलवावे याबाबतचे नियोजन करुन त्यानुसार कार्यवाही करावी याबाबत प्रशासकीय आदेश होते. रत्नागिरी जिल्हयामध्ये कोवीड—१९ चा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव नसल्याने मा. जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी जिल्हयामध्ये कोठेही रेड झोन जाहीर केलेला नव्हता. त्यामुळे, नमुद कालावधीत मा. जिल्हाधिकारी सो. यांच्या आदेशानुसार व शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कोवीड—१९ चे सर्व नियम पाळुन सामनेवाला यांच्या विभागीय कार्यशाळेत दोन पाळयामध्ये कारखाना चालु ठेवण्याची परवानगी घेवुन कर्मचा—यांना त्यांच्या कर्तव्यावर हजर ठेवण्यात आले होते. त्यामुळे, अशा परिस्थितीत अर्जदार यांनी वरील नमुद परिपत्रकीय सुचनानुसार अतिरिक्त विशेष जोखीम स्विकारुन कामगिरी केलेली नाही. त्यांनी केवळ सदर कालावधीत नियमीत काम केलेले आहे. त्याबाबत त्यांना कोवीड कालावधीतील त्यांचे पुर्ण वेतन एकुण रक्कम रु. १,१०,३२१/— अदा करण्यात आलेले आहे. त्यामुळे, अर्जदार वरील नमुद परिपत्रकानुसार प्रतिदिन रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता मिळण्यास पात्र नाहीत. कोवीड कालावधीतील सदरचा विशेष प्रोत्साहन भत्ता सरसकट सर्व कर्मचा—यांना लागु नसुन केवळ ज्या कर्मचा—यांनी अतिरिक्त विशेष जोखीम स्विकारुन कामगिरी केलेली आहे. त्यांनाच फक्त लागु आहे.

त्याप्रमाणे सामनेवाला महामंडळात ज्या कर्मचा—यांनी कोवीड कालावधीत विशेष जोखीम स्विकारुन कामगिरी केलेली आहे अशा कर्मचा—यांना सदरचा कोवीड भत्ता अदा करण्यात आलेला आहे.

९. अर्जदार हे सदरचा कोवीड भत्ता मिळण्यास पात्र आहेत का? आणि सदर भत्ता मिळण्यास अर्जदार पात्र असल्यास सदर रक्कम किती? हे अर्जदार यांनी कोणत्याही न्यायालयामार्फत अथवा कोणत्याही यंत्रणेमार्फत ठरवुन घेतलेले नाही अथवा सदरची बाब सामनेवाला यांनी मान्य केलेली नाही. सदरची बाब ही विवादीत आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज औद्योगिक विवाद कायदा, १९४७ कलम ३३—सी (२) अन्वये चालण्यास पात्र नाही. मात्र अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाचे कामी मा. उच्च न्यायालय यांनी त्यांचे समोरील रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ चे कामी दिलेल्या निर्णयाचा आधार घेतलेला आहे. सदरचा निकाल हा अर्जदार यांच्या मागणी करता लागु होणारा नाही. कारण, सदर निकालपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार हे सदर रिट पिटीशनचे कामी पक्षकार नव्हते व त्या रिट पिटीशन मध्ये अर्जदार यांची वैयक्तिक मागणी नव्हती. सदर रिट पिटीशन मधील मा. उच्च न्यायालयाचा निर्णय हा केवळ जे कर्मचारी वरील नमुद परिपत्रकानुसार कोविड भता मिळण्यास पात्र होतील त्यांना ता अदा करावा एवढ्या पुरताचा मर्यादीत होता. याचा अर्थ सरसकट सर्व कर्मचा—यांना कोविड भत्ता द्यावा असा काढता येणारा नसुन तसा त्या निर्णयाचा अर्थ देखील होत नाही. त्यामुळे, सामनेवाला येथे नम्रपणे नमुद करुन इच्छितात की, प्रस्तुतचा मा. उच्च न्यायालयाचा सदर रिट पिटीशन मधील निर्णय या अर्जदाराच्या मागणीच्या कामी लागु होणार नाही.

१०. वरील परिस्थितीत नि. ओ—३ वर काढण्यात आलेले मुद्दे नमुद करुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नमुद करीत आहेः—

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत अर्जामधील मागणीबाबत अर्जदार यांना पुर्वनिर्मित हक्क व अधिकार असल्याचे अर्जदार शाबीत करतात का? | नकारार्थी. |
| २ | प्रस्तुतचा अर्ज मुदतीमध्ये दाखल केल्याचे अर्जदार शाबीत करतात का? | होकारार्थी. |
| ३ | प्रस्तुत अर्ज दाखल करणेस घडलेले कारण अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्याचे अर्जदार शाबित करतात का? | होकारार्थी. |
| ४ | अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र असल्याचे अर्जदार शाबित करतात काय? | नकारार्थी. |
| ५ | अर्जदार यांनी सामनेवाला यांचे तथाकथित परिपत्रकीय सुचनांनुसार अतिरिक्त विशेष जोखीम स्विकारुन कामगिरी केल्याचे अर्जदार शाबित करतात का? | नकारार्थी. |
| ६ | अर्जदार हे सामनेवाले यांच्याकडुन दि. ०८/०५/२०२० ते ३१/१२/२०२० या कोव्हीड—१९ महामारीच्या कालावधीत काम केल्याबद्दल रु. ३५,१००/— दि. ०३/०६/२०२२ पासुन रक्कम वसुलीपर्यंत | नकारार्थी. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | द. सा. द. शे. १५ टक्के व्याजासह मिळणेस पात्र असल्याचे अर्जदार शाबित करतात का ? | |
| ७ | अर्जदार हे सामनेवाले यांच्याकडुन दि. ०८/०५/२०20 ते ३१/१२/२०२० या कोव्हीड—१९ महामारीच्या कालावधीत काम केल्याबद्दल रु. ३५,१००/— दि. ०३/०६/२०२२ पासुन रक्कम वसुलीपर्यंत द. सा. द. शे. १५ टक्के व्याजासह मिळणेस पात्र आहेत का ? | नकारार्थी. |
| ८ | या अर्जाचा खर्च अर्जदार सामनेवाला यांच्याकडुन वसुल होवुन मिळणेस पात्र आहेत का? | नकारार्थी. |
| ९ | आदेश कोणता ? | अर्ज नि. क्र. यु—१ नामंजुर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

११. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाचे पुष्ठर्थ्य नि. यु—७ वर स्वत:ला तपासुन नि. यु—१३ वर पुरसीस दाखल करुन अधिक तोंडी पुरावा देण्याचा नाही असे कळविलेले आहे.

१२. तसेच अर्जदार हे त्यांचे पुष्ठर्थ्य नि. यु—३ सोबत अ. क्र. १ वर अर्जदार यांनी सामनेवाला महामंडळामध्ये दि. ०८/०५/२०२० ते ३१/१२/२०२० या कालावधीत केलेल्या कामाच्या तपशिलाची सहीसुद नक्कल नि. यु—१० वर हजर केलेली आहे. तसेच, अ. क्र. २ वर सामनेवाला महामंडळाचे महाव्यवस्थापक यांचेकडील परिपत्रक क्र. ३३/२०२१ दि. २९/१०/२०२१ ची छायांकित प्रत 'आर्टिकल — अ' वर हजर केलेली आहे. अ. क्र. ३ वर मे. मुंबई उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ मधील आदेशाची संगणकीय प्रत 'आर्टिकल — ब' वर हजर केलेली आहे. अ. क्र. ४ वर अर्जदार यांनी त्यांचे वकील श्री. जोग यांचेमार्फत सामनेवाला यांना पाठविलेल्या नोटीसीच्या स्थळप्रत नि. यु—११ वर हजर केलेली आहे. अ. क्र. ५ वर सामनेवाला यांनी अर्जदार यांचे नोटीसीस दिलेल्या उत्तराची अस्सल प्रत नि. यु—१२ वर हजर केलेली आहे. तसेच, नि. यु—९ सोबतच्या कागदयादीमधील अ. क्र. १ वर सामनेवाला महामंडळाने लॉकडाउन कालावधीत कर्मचा—यांना कामावर येण्यासाठी जारी केलेल्या दि. ०७/०५/२०२० रोजीच्या कार्यालयीन आदेशाची छायांकित प्रत आर्टिकल 'क' वर हजर केलेली आहे. अ. क्र. २ वर सामनेवाला यांनी त्यांचे अखत्यारितील सर्व विभागांना दिलेल्या दि. १७/०५/२०२२ रोजीच्या पत्राची छायांकित प्रत आर्टिकल 'ड' वर हजर केलेली आहे.

१३. सामनेवाला यांनी त्यांचे लेखी कैफियतीच्या पुष्ठर्थ्य सामनेवाला महामंडळाचे विभाग नियंत्रक श्री. प्रज्ञेश सतीश बोरसे यांना नि. सी—८ वर तपासुन नि. सी—९ वर पुरसीस दाखल करुन अधिक तोंडी पुरावा देण्याचा नाही असे कळविलेले आहे.

१४. तसेच, सामनेवाला हे त्यांचे लेखी कैफियतीचे पुष्ठर्थ्य नि. सी—७ वर महाव्यवस्थापक, म. रा. मा. प. महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांनी विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ, रत्नागिरी यांना कोवीड—१९ कालावधीतील विशेष प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्याबाबतचा झालेला महामंडळ ठराव पाठवित असल्याबाबतचे पत्र व सोबत महामंडळ ठराव क्र. २०२१:०७:१८, दि. ०८/०७/२०२१ ची अस्सल प्रत हजर केलेली आहे.

१५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

## <u>मुददा क्र. १ ते ५ बाबत :—</u>

१६. मुद्दा क्र. १ ते ५ हे परस्परांशी संबंधित असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची चर्चा एकत्रित करण्यात आली.

१७. अर्जदारकरिता विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, आर्टिकल 'ब' वरील आदेशामध्ये नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी पान क्र. २४ परिच्छेद क्र. (इ) मध्ये निरीक्षण नोंदविले आहे की, विशेष प्रोत्साहन भत्ता हा महामंडळाच्या ज्या कर्मचा—यांनी कोरोनाच्या काळात प्रत्यक्ष काम केले आहे त्या सर्वांना लागु आहे. सदरील परिच्छेदामध्ये **'shall'** हा शब्द नामदार मुंबई उच्च न्यायालय यांनी वापरलेला आहे. त्यामुळे विशेष प्रोत्साहन भत्ता कोरोनाच्या काळामध्ये महामंडळाच्या ज्या ज्या कर्मचा—यांनी प्रत्यक्ष काम केलेले आहे त्या सर्वांना देणे महामंडळावर बंधनकारक आहे. तसेच 'विशेष जोखीम' हे शब्द नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सदरील आदेशामध्ये कोठेही नमुद नाहीत. कोरोनाच्या काळामध्ये अर्जदार हे सामनेवाला महामंडळाच्या एस.टी. बसमधुन कर्तव्यावर हजर राहत होते व कामाची वेळ संपल्यानंतर सामनेवाला महामंडळाच्या एस.टी.बस मधुन आपल्या घरी परत जात होते. एस. टी. बसमध्ये

५५ आसनांची क्षमता असते. तसेच कोरोनाचा विषाणु हा २५ फुटापर्यंत हवेत पसरु शकतो. कोरोना कालावधीमध्ये अर्जदार हे सामनेवाला महामंडळाच्या इतर कर्मचा—यांसोबत एकत्रितरित्या सामनेवाला यांच्या वर्कशॉपमध्ये कर्तव्य बजावत होते. त्यामुळे, ते विशेष जोखिम पत्कारुन त्यांचे कर्तव्य बजावत होते. सामनेवाला यांनी आर्टिकल 'अ' वरील परिपत्रकाचा व वर नमुद नामदार मुंबई उच्च न्यायालय यांचे आदेशाचा चुकीचा अर्थ हा अर्जदार यांना विशेष प्रोत्साहन भत्ता देण्यास लागु नये याकरिता काढलेला आहे. सदरील परिपत्रकामध्ये देखील 'विशेष जोखिम' या शब्दांची व्याख्या कोठेही नमुद करण्यात आलेली नाही. अर्जदार यांनी आर्टिकल 'क' वरील दि. ०७/०५/२०२० रोजीच्या सामनेवाला यांच्या आदेशानुसार दि. ०८/०५/२०२० पासुन सामनेवाला यांच्या वर्कशॉपमध्ये कर्तव्य बजावलेले आहे.

१८. तसेच, सदरील विशेष प्रोत्साहन भत्ता मिळण्यासाठी अर्जदार यांनी सामनेवाला यांना दि. १०/०७/२०२३ रोजी नोटीस पाठवुन देखील प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी मागणी केलेला विशेष प्रोत्साहन भत्ता सामनेवाला यांनी अर्जदार यांना न देता दि. २७/०७/२०२३ रोजी अर्जदार यांच्या वर नमुद नोटीसीस खोटे उत्तर पाठवुन नाकारला. त्यामुळे, सदरील खोटे उत्तर पाठविल्यापासुन अर्जास कारण घडलेले आहे. तसेच, अद्याप सामनेवाला महामंडळाने अर्जदार यांना विशेष प्रोत्साहन भत्ता दिलेला नसल्यामुळे प्रस्तुत अर्जास सतत कारण घडत आहे.

१९. अर्जदारकरिता विधीज्ञांनी पुढे युक्तीवाद केला की, सामनेवाला यांनी अर्जदार यांना पाठविलेल्या नि. क्र. यु—१२ वरील नोटीस उत्तरामध्ये महामंडळाचे नाव विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, रत्नागिरी असे नमुद केलेले आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये सामनेवाला यांचे नाव योग्य प्रकारे नमुद केलेले आहे. तसेच, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे

कलम ३३—सी (२) मध्ये कोठेही सदरील कलमाअन्वये अर्ज दाखल करण्यासाठी अर्जदार यांना पुर्वनिर्मित हक्क व अधिकार असणे आवश्यक असते असे नमुद नाही. आर्टिकल 'ब' वरील नामदार उच्च न्यायालय यांचे आदेशामध्ये अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार स्थापित झालेला आहे. वर नमुद नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार स्थापन झालेले असल्यामुळे सदरील आदेश दोन्ही बाजुंवर बंधनकारक आहे. सदरील युक्तीवादाच्या पुष्ठर्थ्य अर्जदार करिता विधिज्ञांनी खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतला:—

**१. प्रकाश डी. बांदिवडेकर वि. किल्लीक स्लॉटेड ॲंगल्स व इतर, १९९६ १ सीएलआर ८४८ ;**

**२. ॲग्रिकल्चर प्रोडयुस मार्केट कमिटी वि. पर्शुराम गोपलजी कोरे, २०११(५) ऑल एमआर ७१४.**

२०. अर्जदार करिता विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, नि. क्र. यु—१० वरील अर्जदार यांनी सामनेवाला महामंडळामध्ये केलेल्या कामाचा तपशिलामध्ये अर्जदार यांचा हुद्दा 'लिपिक टंकलेखक' असा सामनेवाला यांनीच नमुद केलेला आहे. त्यामुळे, अर्जदार हे सामनेवाला यांचे 'कामगार' आहेत हे सिध्द होते. तसेच, अर्जदार यांना पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ मधील तरतुदी लागु होत नाहीत. तसेच, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसार अर्ज दाखल करण्यासाठी कोणतीही मुदत कायद्याने निर्धारीत केलेली नाही. त्यामुळे, प्रस्तुत अर्जास मुदत अधिनियमाची बाधा येत नाही.

२१. सामनेवाला यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये अर्जदार यांनी विशेष जोखीम स्विकारुन काम केल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे व

अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणामधील सर्व मुद्‌दे शाबीत केलेले असल्यामुळे अर्ज मंजुर होणे आवश्यक आहे.

२२. सामनेवालाकरिता विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, आर्टिकल 'अ' वरील सामनेवाला महामंडळाच्या परिपत्रक क्र. ३३/२०२१, दि. २९/१०/२०२१ मध्ये संदर्भ क्र. १ क्र. रा.प./वाह/चालन/१७१९, दि. ०७/०४/२०२० व संदर्भ क्र. २ कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक क्र. १०/२०२०, क्र. रा.प./कर्मवर्ग/मा.प्रशा/१६२१, दि. ३०/०४/२०२० हे दोन्ही संदर्भ सदरील अर्जाचे कामी विचारात घेणे आवश्यक आहे. आर्टिकल 'अ' वरील परिपत्रकाचा अर्थ लावताना संदर्भ क्र. २ वर असलेले कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक क्र. १०/२०२० व महामंडळ ठराव क्र. २०२१:०७:१८ दि. ०८/०७/२०२१ हे वाचणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी जाणुनबुजुन आर्टिकल 'अ' वरील परिपत्रक क्र. ३३/२०२१ मधील वर नमुद संदर्भ क्र. १ व २ न्यायालयापासुन लपविलेले आहे. सामनेवाला यांनी वर नमुद दि. ०८/०७/२०२१ रोजीचा ठराव नि. क्र. सी—७ वर दाखल केलेला आहे.

२३. सदरील नि. क्र. सी—७ वरील ठरावाचे अवलोकन केले असता त्यामध्ये '**विशेष जोखीम स्विकारुन अत्यावश्यक प्रवासी सेवा बजावत होते अशी कामगिरी बजावत असलेल्या कर्मचा—यांना प्रतिकर्तव्य प्रति दिन रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्यात आल्याबाबतच्या सुचना कर्मचारी वर्ग खाते परिपत्रक क्र. १०/२०२०, क्र. रा.प./कर्मवर्ग/मा. प्रशा/१३२१, दि. ३०/०४/२०२० नुसार निर्गमित केले असुन सदर परिपत्रकास कार्योत्तर मंजुरी दिली'** वगैरे गोष्टी नमुद केल्या आहेत. त्यामुळे, सदरील आर्टिकल 'अ' वरील परिपत्रक हे केवळ सामनेवाला महामंडळाच्या ज्या कर्मचा—यांनी कोरोना कालावधीमध्ये विशेष जोखिम स्विकारुन अत्यावश्यक प्रवासी सेवा बजावलेल्या आहेत त्यांनाच लागु आहे. अर्जदार यांनी कोरोना

कालावधीमध्ये सामनेवाला महामंडळाच्या वर्कशॉप मध्ये काम केलेले आहे. त्यांनी कोणतीही प्रवासी सेवा बजावलेली नाही. सदरील गोष्ट अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये देखील मान्य केलेली आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अर्जदार यांनी ते कोरोना कालावधीमध्ये सामनेवाला महामंडळाच्या एस.टी. बसमध्ये बसुन बसची दुरुस्ती करण्यासाठी जात होते असा कोणताही पुरावा पटलावर आणलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी विशेष जोखीम स्विकारुन कोणतीही प्रवासी सेवा बजावलेली नाही.

२४. सामनेवाला करिता विधिज्ञांनी पुढे युक्तीवाद केला की, आर्टिकल 'ब' वरील नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये अर्जदार अथवा अर्जदार सदस्य असलेली कामगार संघटना हे पक्षकार नाहीत. त्यामुळे, तो आदेश अर्जदार यांच्या संबंधित नाही. अर्जदार यांनी ते संघर्ष एस. टी. कामगार संघटना व इतर या कामगार संघटनेचे सदस्य असल्याचा देखील कोणताही पुरावा पटलावर आणलेला नाही. त्यामुळे आर्टिकल 'ब' वरील मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश त्यांना लागु नाही. तसेच सदरील आदेशामध्ये प्रस्तुत अर्जदार हे विशेष प्रोत्साहन भत्ता मिळणेस पात्र असल्याबाबत देखील नामदार मुंबई उच्च न्यायालय यांनी आदेशित केलेले नाही. सदरील आदेशामध्ये देखील अर्जदार यांचा सामनेवाला महामंडळाकडुन विशेष प्रोत्साहन भत्ता मिळण्याचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार स्थापित झालेला नाही.

२५. अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा असुन अर्जदार यांचे कामाचे स्वरुप काय आहे हे देखील अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमुद केलेले नाही. सदरील अर्जामध्ये अर्जास कारण केव्हा घडले, प्रस्तुतचा अर्ज हा कसा मुदतीमध्ये आहे याबद्दल निश्चीत नमुद करण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र नाही.

२६. सर्वात महत्वाचे म्हणजे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) अन्वयेचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार अर्जदार यांनी सक्षम न्यायालयाकडुन ठरवुन घेतलेला नाही. सामनेवाला यांनी अर्जदार यांचे नोटीसीला उत्तर पाठवुन व प्रस्तुत अर्जास लेखी कैफियत दाखल करुन अर्जदार यांचा सदरील पुर्वनिर्मित हक्क व अधिकार सुरुवातीपासुनच नाकारलेला आहे. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) अन्वये कामगार न्यायालय हे केवळ एक्झीक्युटींग कोर्ट आहे. त्यामुळे, सदरील कलमान्वयेची दरखास्त केवळ प्रस्तुत कामगार न्यायालयामध्ये चालु शकते.

२७. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदार यांनी विशेष प्रोत्साहन भत्ता मिळणेची मागणी केलेली आहे. परंतु, भत्ते हे पेमेंट ऑफ वेजीस ॲक्ट, १९३६ नुसार मागता येतात. त्यामुळे, अर्जदार यांनी सदरील विशेष प्रोत्साहन भत्ता मिळणेची दाद सदरील पेमेंट ऑफ वेजीस ॲक्ट, १९३६ नुसार सर्वप्रथम मागणे आवश्यक होते. पेमेंट ऑफ वेजीस ॲक्ट, १९३६ नुसारचा अर्ज दाखल करण्याची मुदत ही भत्ते देय झाल्यापासुन १२ महिन्यामध्ये दाखल करणे अशी आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांचे कथनानुसार विशेष प्रोत्साहन भत्ता ३१/१२/२०२० रोजी देय झाला. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज सदरील कायद्याच्या कलम १५ (२) नुसार अर्जदार यांनी दि. ३१/१२/२०२० पासुन १२ महिन्यांमध्ये दाखल करणे आवश्यक होते. प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस झालेल्या विलंबाचे कोणतेही कारण अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केलेले नाही. तसेच, अर्जास कोणते कारण घडले हे देखील निश्चीतपणे अर्जदार यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केले नसल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ७ नियम ११ नुसार प्रस्तुतचा अर्ज फेटाळणे आवश्यक आहे.

२८. सामनेवालाकरिता विधिज्ञांनी पुढे युक्तीवाद केला की, अर्जदार यांनी त्यांचे नि. क्र. यु—७ वरील पुराव्याचे शपथपत्रामधील परिच्छेद क्र. ३ मध्ये

सामनेवाला यांनी अर्जदार यांचे नोटीसीस दिलेल्या उत्तरामधील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास निशाणी देण्यात यावी असे नमुद केलेले आहे. त्यामुळे, अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज येथेच संपलेला आहे. अर्जदार यांनी त्यांचे पुराव्यामध्ये सदरील नोटीसीस दिलेले उत्तर नाकारलेले नाही. अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये त्यांनी कोरोना कालावधीमध्ये प्रवाशांना ने आण करण्याचे काम केलेले नसल्याचे मान्य केलेले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये अथवा त्यांच्या नि. क्र. यु—७ वरील पुराव्यामध्ये कोठेही सामनेवाला यांच्या उलटतपासणीमध्ये त्यांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांबाबतची वाद कथने नमुद केलेली नाहीत. त्यामुळे, अर्जदार यांनी सामनेवाला यांच्या उलटतपासणीमध्ये कल्पोकल्पीत प्रश्न व गोष्टी सामनेवाला यांना विचारल्याचे स्पष्ट होते.

२९. अर्जदार यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये सामनेवाला यांच्या लेखी कैफियतीमधील सर्व गोष्टी निश्चीतपणे मान्य केलेल्या आहेत. तसेच, कोरोना कालावधीमध्ये विशेष जोखीम पत्करुन कोणती सेवा केली याचा अर्जदार यांनी पटलावर पुरावा आणलेला नाही. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये ते 'लिपिक टंकलेखक' म्हणुन सामनेवाला यांच्या आस्थापनेमध्ये काम करत असल्याबाबत नमुद केलेले आहे. परंतु, अर्जदार यांनी 'लिपिक टंकलेखक' या पदाचे कामाचे स्वरुप काय असते हे कोठेही त्यांचे अर्जामध्ये नमुद केलेले नाही. त्यामुळे सदरील पद हे 'कामगार' या व्याख्येमध्ये मोडते का याचा बोध होत नाही. प्रस्तुत अर्जाचा विचार करता अर्जदार यांनी त्यांचे कर्तव्य कोरोना कालावधीमध्ये पार पाडत असताना प्रवासी सेवा केली आहे की नाही हे पाहणे आवश्यक आहे. नोकरीवर येताना किंवा कर्तव्य संपवुन घरी जाताना सामनेवाला यांच्या एस.टी. बसमधुन अर्जदार ये जा करत होते याबाबत अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये कोठेही नमुद केले नाही.

३०. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या परिशिष्ट २ मध्ये सदरील कायद्यानुसार कामगार न्यायालय यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये कोणती प्रकरणे येतात हे नमुद केलेले आहे. सदरील कायद्याच्या परिशिष्ट ३(२) मध्ये सदरील कायद्यानुसार भत्ते हे औद्योगिक न्यायालयामध्ये अर्ज करुन मागता येतात असे नमुद केलेले आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी सदरील कायद्याच्या परिशिष्ट ३(२) नुसार औद्योगिक न्यायालयामध्ये दाखल करणे आवश्यक होते. त्यामुळे, प्रस्तुत न्यायालयास सदरील अर्ज चालविण्याचे अधिकारक्षेत्र नाही.

३१. अर्जदार यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये त्यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार आहे, सदरील अर्ज मुदतीमध्ये दाखल केला आहे व प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस घडलेले कारण व प्रस्तुत अर्ज चालणेस का पात्र आहे या गोष्टी निश्चीतपणे नमुद केलेल्या नाहीत. तसेच, सामनेवाला यांच्या बचावाचे खंडण करणारा कोणताही पुरावा पटलावर सादर केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणामधील मुद्दे शाबीत केलेले नाहीत.

३२. तसेच, अर्जदारकरिता विधिज्ञांनी आधार घेतलेले न्यायनिर्णयांमधील वस्तुस्थिती व प्रस्तुत प्रकरणामधील वस्तुस्थिती वेगळी असल्यामुळे त्या न्यायनिर्णयांमधील गुणोत्तरे प्रस्तुत प्रकरणास लागु होत नाहीत. **प्रकाश डी. बांदिवडेकर वि. किल्लीक स्लॉटेड ॲंगल्स व इतर, १९९६ १ सीएलआर ८४८** हे प्रकरण महाराष्ट्र कामगार संघटनाना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा बंदी अधिनियम, १९७१ चे आयटम ९ नुसार औद्योगिक न्यायालयासमोर दाखल करण्यात आले होते. सदरील प्रकरण हे प्रकरण दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याबाबत होते. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कोणतेही स्पष्टीकरण

अर्जदार यांनी दिलेले नसल्यामुळे प्रस्तुत न्यायनिर्णयामधील गुणोत्तर प्रस्तुत प्रकरणास लागु पडत नाही. तसेच **ॲग्रिकल्चर प्रोडयुस मार्केट कमिटी वि. पर्शुराम गोपलजी कोरे, २०११(५) ऑल एमआर ७१४** या न्यायनिर्णयामधील वस्तुस्थितीदेखील प्रस्तुत प्रकरणापेक्षा वेगळी आहे. त्या प्रकरणामध्ये त्यामधील कामगाराचा पुर्वनिर्मित हक्क पुर्वीच ठरविण्यात आला होता. परंतु, सदरील प्रकरणामधील अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क अद्याप ठरलेला अथवा स्थापित झालेला नाही. त्यामुळे, सदरील दोन्ही न्यायनिर्णयामधील गुणोत्तरे प्रस्तुत प्रकरणास लागु पडत नाहीत.

३३. सामनेवालाकरिता विधिज्ञांनी त्यांचे युक्तीवादाचे पुष्ठर्थ्य खालील न्यायनिर्णयांचा आधार घेतलाः—

**१. डी कृष्णन व इतर वि. स्पेशल ऑफिसर, वेल्लोर को—ऑपरेटीव्ह शुगर मिल व इतर, मनु/एससी/७७५०/२००८;**

**२. हितेंद्र लक्ष्मीचंद सोनी वि. शेख ॲण्ड कंपनी, मनु/जीजे/०८०१/२०१६;**

**३. जगन्नाथ बारीक व इतर वि. लेबर कोर्ट व इतर, मनु/ओआर/०१२०/१९९२;**

**४. श्री वारणा ॲग्रीकल्चरल गुड्स प्रोसेसिंग को—ऑपरेटिव्ह सोसायटी लि., वारणानगर, कोल्हापूर वि. दिलीप डी. पाटील व इतर, मनु/एमएच/१३५७/२०११.**

३४. अर्जदारकरिता विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, सामनेवालाकरिता विधिज्ञांनी सादर केलेले वर नमुद न्यायनिर्णयांमधील वस्तुस्थिती ही प्रस्तुत प्रकरणामधील वस्तुस्थितीपेक्षा वेगळी असल्याने सदरील न्यायनिर्णयांमधील गुणोत्तरे प्रस्तुत प्रकरणास लागु पडत नाहीत. तसेच, वर नमुद **डी कृष्णन** या प्रकरणामध्ये कामगाराचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार वादातीत

होता. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार वादातीत नाही.

३५. अर्जदारकरिता सादर वर नमुद न्यायनिर्णयांचे अवलोकन केले.

३६. येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, वर नमुद **प्रकाश डी बांदिवडेकर** या न्यायानिर्णयामधील प्रकरण हे महाराष्ट्र कामगार संघटनाना मान्यता आणि अनुचित कामगार प्रथा बंदी अधिनियम, १९७१ चे आयटम ९ नुसार दाखल करण्यात आले होते असे सदरील न्यायनिर्णयाचे अवलोकन केल्यावरुन दिसुन येते. तसेच, सदरील प्रकरणामध्ये तक्रार दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यासाठी भरपूर पुरावा पटलावर असताना देखील औद्योगिक न्यायालयाने कामगाराची तक्रार मुदत बाहय आहे असे नोंदविलेले निरीक्षण चुकीचे आहे असे निरीक्षण नामदार मुंबई उच्च न्यायालयांनी नोंदविल्याचे दिसुन येते.

३७. वर नमुद **ॲग्रिकल्चर प्रोडयुस मार्केट कमिटी** या न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्या प्रकरणामध्ये कामगाराने सादर केलेला कागदोपत्री पुरावा **ॲग्रिकल्चर प्रोडयुस मार्केट कमिटी**ने कामगाराच्या उलटतपासणीच्या वेळेस नाकारलेला नव्हता. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार यांनी सादर केलेला कागदोपत्री पुरावा सामनेवाला यांनी अर्जदार यांचे उलटतपासणीचे वेळेस नाकारलेला आहे. सदरील **ॲग्रिकल्चर प्रोडयुस मार्केट कमिटी** या प्रकरणामधील वस्तुस्थिती देखील प्रस्तुत प्रकरणामधील वस्तुस्थितीपेक्षा वेगळी दिसुन येते. त्यामुळे, सदरील न्यायनिर्णय प्रस्तुत प्रकरणास लागु पडत नाही.

३८. सामनेवाला यांनी सादर केलेल्या **डी कृष्णन व इतर आणि हितेंद्र लक्ष्मीचंद सोनी** या दोन्ही न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. त्यामध्ये औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसार अर्ज दाखल करण्यापुर्वी अर्जदार यांना पुर्वनिर्मित हक्क व अधिकार असल्याचे न्यायालयाने न्यायनिर्णीत केलेले असणे (Adjudicated) किंवा ठरविलेले (Determined) असणे किंवा अर्जदार यांचा सदरील पुर्वनिर्मित हक्क किंवा अधिकार वादातीत नसणे आवश्यक असते असे निरीक्षण नोंदविलेले आहे.

३९. **जगन्नाथ बारिक व इतर** या न्यायनिर्णयामध्ये नामदार ओरिसा उच्च न्यायालय यांनी परिच्छेद क्र. ९ मध्ये निरीक्षण नोंदविले आहे की, बोनस व घरभाडे भत्ता या गोष्टी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे परिशिष्ठ ३ नुसार औद्योगिक न्यायालय यांच्या अधिकारक्षेत्रामध्ये येतात.

४०. **श्री वारणा ॲग्रिकल्चरल गुड्स प्रोसेसिंग को—ऑपरेटिव्ह सोसायटी** या प्रकरणामध्ये औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसारचे अर्जामध्ये अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेल्या रक्कमेचा निश्चीत आकडा नमुद करणे आवश्यक असुन सदरील निश्चीत आकडा अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमुद केला नसेल तर सदरील कलमान्वयेचा अर्ज टिकणारा नसतो. तसेच, सदरील कलमान्वयेचा अर्ज एक्झीक्युशन प्रोसिडींग स्वरुपामध्ये असतो असे निरीक्षण नामदार मुंबई उच्च न्यायालय यांनी नोंदविलेले आहे.

४१. नि. क्र. यु—१ वरील अर्जाचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी त्यांच्या अर्जातील परिच्छेद क्र. ३ मध्ये प्रस्तुतचा अर्ज मुदतीमध्ये आहे व परिच्छेद क्र. २ क मध्ये अर्जदार यांनी विशेष प्रोत्साहन भत्ता मिळण्यासाठी वकील श्री. व्ही. जे. जोग यांचेमार्फत दि. १०/०७/२०२३ रोजी सामनेवाला यांना नोटीस पाठविली असता त्यास सामनेवाला यांनी

दि. २७/०७/२०२३ रोजी खोडसाळ उत्तर दिले व अर्जदार यांची देय रक्कम दिली नाही. त्यामुळे सदरील रक्कमेच्या वसुलीसाठी अर्जदार यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करावा लागत आहे असे नमुद असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये सदरचा अर्ज मुदतीत असुन प्रस्तुत अर्जास कारण कधी घडले या दोन्ही गोष्टी निश्चीतपणे नमुद केल्याचे दिसुन येते. तसेच, सदरील अर्जास कारण हे दि. २७/०७/२०२३ रोजी घडल्याचे दिसुन येते व प्रस्तुतचा अर्ज हा दि. ०७/०८/२०२३ रोजी प्रस्तुत न्यायालयामध्ये दाखल केल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरील अर्ज अर्जास कारण घडल्यापासुन अंदाजे १५ दिवसाच्या आत दाखल केल्याचे दिसते. त्यामुळे सदरील अर्ज दाखल करणेस कोणताही विलंब झाला नसल्याचे दिसुन येते. सर्वात महत्वाचे म्हणजे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसारचा अर्ज दाखल करण्याची कोणतीही निश्चीत मुदत सदरील कायद्यामध्ये नमुद केलेली नाही.त्यामुळे, मुद्दा क्र. २ व ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते.

४२. सामनेवाले यांचे कथनानुसार अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करण्यापुर्वी पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ नुसार अर्ज दाखल करणे आवश्यक होते. सदरील कायद्यान्वये अर्ज न दाखल करता अर्जदार यांनी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसार अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, तो टिकणारा नाही. येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ मधील औद्योगिक व इतर आस्थापना या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले असता सदरील कायदा हा ट्राम वे सर्व्हीस, मोटार ट्रान्सपोर्ट सर्व्हीस, उदाहरणार्थ — ट्रक मधुन मालवाहतुक किंवा प्रवासी वाहतुक करणा—या वाहनांना, फॅक्टरीज व ज्या वर्कशॉप मध्ये वस्तुंचे उत्पादन केले जाते अशा आस्थापनांना लागु आहे असे दिसुन येते. परंतु,

सामनेवाला महामंडळ सदरील प्रकारचे कोणतेच काम करत नसल्यामुळे सामनेवाला आस्थापनेमध्ये काम करणा—या कर्मचा—यांना पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, १९३६ लागु नसल्याचे दिसुन येते.

४३. सामनेवाले यांच्या कथनानुसार अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या मथळयामध्ये सामनेवाला म्हणुन राज्य परिवहन महामंडळ, रत्नागिरी असा उल्लेख केलेला असला तरी सामनेवाला महामंडळाचे पुर्ण नाव महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ असे आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी सामनेवाला यांना योग्य नावानुसार पक्षकार न केल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज योग्य पक्षकारांची कमतरता या सदराखाली बाधीत आहे. परंतु, अर्जदारकरिता विधीज्ञांनी युक्तीवाद केल्याप्रमाणे सामनेवाला यांनी नि. क्र. यु—१० वरील अर्जदार यांचे कामाचे दिलेल्या तपशिलाच्या प्रतीचे व नि. क्र. यु—१२ वरील सामनेवाला यांनी अर्जदार यांचे नोटीसीस दिलेल्या उत्तराच्या प्रतीचे अवलोकन केले असता त्यामध्ये सामनेवाला यांनी उपयंत्र अभियंता, राज्य परिवहन, रत्नागिरी व विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, रत्नागिरी असे नाव नमुद केल्याचे दिसुन येते. यावरुन सामनेवाला महामंडळ स्वत:चे नाव राज्य परिवहन, रत्नागिरी असे देखील वापरते हे स्पष्ट होते. त्यामुळे, सामनेवाला यांचे सदरील कथनामध्ये तथ्य आढळत नाही.

४४. सामनेवाला यांच्या कथनानुसार अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये ते ‘कामगार’ या व्याख्येमध्ये कसे बसतात हे नमुद केलेले नाही. त्यामुळे, त्यांचे पद ‘कामगार’ या व्याख्येमध्ये मोडते का याचा बोध होत नाही. निश्चीतच अर्जदार यांनी त्यांच्या मुळ अर्जामध्ये व पुराव्याचे शपथपत्रामध्ये ‘लिपिक टंकलेखक’ हे पद औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील ‘कामगार’ या व्याख्येमध्ये कसे बसते व त्यांचे कामाचे स्वरुप काय आहे हे

नमुद केलेले नाही. त्यामुळे, अर्जदार हे सदरील कायद्यान्वये 'कामगार' या व्याख्येमध्ये मोडतात हे सिध्द झालेले नाही.

४५. सामनेवाला यांच्या कथनानुसार अर्जदार यांना प्रस्तुत अर्ज दाखल करण्याचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार नाही. अर्जदार हे प्रस्तुत प्रकरणामध्ये मागणी केलेला विशेष प्रोत्साहन भत्ता मिळणेस पात्र असल्याचा कोणत्याही न्यायालयाने निवाडा दिलेला नाही. त्यामुळे, अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार अद्याप ठरलेला नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज कायद्याने टिकणारा नाही. निश्चीतच, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसार अर्ज दाखल करण्यापुर्वी अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क व अधिकार अविवादीत असणे आवश्यक असते व सदरील पुर्वनिर्मित हक्क व अधिकार विवादीत असेल तर सदरील कलमानुसार अर्ज दाखल करण्याचा अधिकार अर्जदार यांना नसतो असे कायद्याचे स्थापित तत्व आहे. येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, अर्जदार यांचे कथनानुसार त्यांचा प्रस्तुत प्रकरणामधील पुर्वनिर्मित हक्क व अधिकार नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ मध्ये त्यांचे दि. ०७/०४/२०२२ चे आदेशानुसार न्यायनिर्णीत किंवा ठरविलेला आहे. सदरील आर्टिकल 'ब' वरील नामदार मुंबई उच्च न्यायालय यांचे दि. ०७/०४/२०२२ रोजीचे आदेशाचे अवलोकन केले. त्यामध्ये निश्चीतच, अर्जदार पक्षकार नसल्याचे दिसुन येते. सर्वात महत्वाचे म्हणजे अर्जदार यांनी त्यांचे उलटतपासणीमध्ये ते सदरील रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ मध्ये वैयक्तिकरित्या पक्षकार नसल्याचे मान्य केलेले आहे. सदरील आदेशामधील पान क्र. २४ वरील परिच्छेद (इ) चे अवलोकन केले असता नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी पारीत केलेले परिपत्रक क्र. ३३, दि. २९/१०/२०२१ रिट पिटीशन नं. ४२४९/२०२१ पान क्र. २४५ हे महामंडळाच्या ज्या

कर्मचा—यांनी दि. २३/०३/२०२० ते ३१/१२/२०२० या कोरोना महामारीच्या कालावधीमध्ये प्रत्यक्ष काम केलेले आहे त्यांना प्रतिदिवस विशेष प्रोत्साहन भत्ता रक्कम रु. ३००/— मंजुर करणेबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ तर्फे श्री. अस्पी चिनॉय यांनी केलेले विधान स्विकारण्यात येते व महामंडळाने सदरील कर्मचा—यांना सदरील भत्त्याची थकबाकी दि. ०७/०४/२०२२ पासुन ८ आठवड्यांमध्ये द्यावी असे नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी आदेशित केल्याचे दिसुन येते. सदरील न्यायनिर्णयामध्ये प्रस्तुत अर्जदार हे प्रस्तुत प्रकरणामध्ये मागणी केलेला विशेष प्रोत्साहन भत्ता मिळणेस पात्र आहेत असे निश्चीतपणे कोठेही नमुद केलेले नाही. त्यामुळे, नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी अर्जदार यांचा प्रस्तुत प्रकरणामधील पुर्वनिर्मित हक्क व अधिकार न्यायनिर्णीत केल्याचा किंवा ठरविल्याबाबतचे अर्जदार यांचे कथन स्विकारण्याजोगे नाही.

४६ वर नमुद **डी कृष्णन व हितेंद्र लक्ष्मीचंद सोनी** न्यायनिर्णयांमध्ये आदरणीय सर्वोच्च न्यायालय व आदरणीय उच्च न्यायालय यांनी निरीक्षण नोंदविल्याप्रमाणे औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३—सी (२) नुसारचा अर्ज हा अर्जदारचा पुर्वनिर्मित हक्क किंवा अधिकार वादातीत नसेल किंवा अर्जदार यांचा पुर्वनिर्मित हक्क न्यायालयाने न्यायनिर्णीत केलेला असेल किंवा ठरवुन दिलेला असेल तरच कामगार न्यायालयामध्ये दाखल करता येतो. वर नमुद दि. २७/०७/२०२३ च्या नि. क्र. यु—१२ वरील नोटीसीच्या उत्तराचे अवलोकन केले असता व पटलावरील सामनेवाला यांच्या लेखी कैफियतीचे अवलोकन केले असता अर्जदार यांचा प्रस्तुत अर्जामधील पुर्वनिर्मित्त हक्क व अधिकार सामनेवाला यांनी नाकारल्याचे दिसुन येते. तसेच, अर्जदार यांना सदरील अर्जामध्ये मागणी केलेली रक्कम मिळण्याचा पुर्वनिर्मित हक्क आहे असा न्यायालयाने दिलेला निकाल

किंवा आदेश वगैरे अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये हजर केलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील मागणीबाबत त्यांना पुर्वनिर्मित हक्क व अधिकार आहे हे शाबित केले नाही. त्यामुळे, मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

४७. नि. क्र. सी—७ वरील महामंडळ ठराव क्र. २०२१:७:१८, दि. ०८/०७/२०२१ याचे अवलोकन केले असता वर नमुद विशेष प्रोत्साहन भत्ता सामनेवाला महामंडळातील विशेष जोखीम स्विकारुन अत्यावश्यक प्रवासी सेवा कोरोना कालावधीमध्ये बजावणा—या कर्मचा—यांना देण्याचे निर्देश देण्यात आले होते असे दिसुन येते. आर्टिकल ‘अ’ वरील परिपत्रक क्र. ३३/२०२१ मध्ये सदरील दि. ०८/०७/२०२१ रोजीचे ठरावाचा उल्लेख करण्यात आल्याचे दिसुन येते. सदरील परिपत्रकाचे परिच्छेद क्र. १ मध्ये संदर्भाधीन परिपत्रक क्र. २ अन्वये रा. प. महामंडळात अत्यावश्यक सेवेअंतर्गत संचार बंदी कालावधीत प्रत्यक्ष कर्तव्य करणा—या रा. प. कर्मचारी/पर्यवेक्षक यांना प्रतिदिन प्रतिकर्तव्य रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता दि. २३/०३/२०२० पासुन संचार बंदी संपेपर्यंत अनुज्ञेय करणेबाबत सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत असे नमुद केले आहे. तसेच, सदरील परिपत्रकाच्या परिच्छेद क्र. २ मध्ये महामंडळ ठराव क्र. २०२१:७:१८, दि. ०८/०७/२०२१ अन्वये संदर्भीत परिपत्रक २ मधील सुचना कायम ठेवुन दि. ३१/१२/२०२० पर्यंत रा. प. कर्मचारी/पर्यवेक्षक यांना प्रतिदिन प्रतिकर्तव्य रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्यास मंजुरी दिली आहे. सदरील आर्टिकल ‘अ’ वरील परिपत्रकाचा आधार घेवुनच अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे ही बाब वादातीत नाही.

४८. येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, परिपत्रक क्र. ३३/२०२१ मधील परिच्छेद क्र. २ मध्ये नमुद नि. क्र. सी—७ वरील

दि. ०८/०७/२०२१ रोजीचा महामंडळ ठराव हा नामदार मुंबई उच्च न्यायालय यांचे वर नमुद दि. ०७/०४/२०२२ रोजीचे आदेशापुर्वी पारीत करण्यात आल्याचे दिसुन येते. सदरील ठरावामधील पान क्र. २४ चे अवलोकन केले असता **'कोविड—१९ च्या अनुषंगाने, दि. २३/०३/२०२० पासुन रा. प. महामंडळाच्या चालनीय तसेच प्रशासकीय कामासाठी चालक/वाहक, चालक तथा वाहक/यांत्रिकी/पर्यवेक्षकीय तसेच प्रशासकीय कर्मचारी हे विशेष जोखीम स्विकारुन अत्यावश्यक प्रवासी सेवा बजावत होते अशी कामगिरी बजावत असलेल्या कर्मचा—यांना प्रतिकर्तव्य प्रतिदिन रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय करण्यात आल्या बाबतच्या सुचना कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १०/२०२० क्र. राप/कर्मवर्ग/सा.प्र./१३२१, दि. ३०/०४/२०२० नुसार निर्गमित केल्या असुन सदर परिपत्रकास कार्योत्तर मंजुरी दिली'** असे नमुद असल्याचे दिसुन येते व त्याचाच संदर्भ नामदार उच्च न्यायालय यांनी आर्टिकल 'ब' वरील आदेशामध्ये घेतल्याचे दिसुन येते. त्यामुळे, नामदार उच्च न्यायालय यांनी कोरोना महामरीच्या कालावधीमध्ये महामंडळाच्या ज्या कर्मचा—यांनी सदरील कालावधीमध्ये प्रत्यक्ष काम केले आहे त्यांना विशेष प्रोत्साहन भत्ता देणेत येणेबाबत आदेशित केले असले तरीदेखील ज्या कर्मचा—यांनी कोरोना महामारीच्या कालावधीत म्हणजेच दि. २३/०३/२०२० पासुन विशेष जोखीम स्विकारुन अत्यावश्यक प्रवासी सेवा बजावलेली आहे अशा कर्मचा—यांना प्रतिदिन प्रतिकर्तव्य रु. ३००/— विशेष प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे असा त्या आदेशाचा अर्थ निघतो. निश्चितच, आर्टिकल 'अ' वरील परिपत्रक क्र. ३३/२०२१, दि. २९/१०/२०२१ च्या परिपत्रकाचा अर्थ लावताना सदरील परिपत्रकामधील संदर्भ क्र. १ व २ वरील परिपत्रक आणि नि. क्र. सी—७ वरील ठराव वाचणे आवश्यक आहे.

४९. येथे एक गोष्ट नमुद कराविशी वाटते की, अर्जदार व सामनेवाला यांनी त्यांच्या पुराव्याचे शपथपत्रांमध्ये अनुक्रमे त्यांचे मुळ अर्जामधील व लेखी कैफियतीमधील कथने केलेली आहेत.

५०. अर्जदार यांच्या कथनानुसार कोरोनाच्या काळामध्ये अर्जदार हे सामनेवाला महामंडळाच्या एस.टी. बसमधुन कर्तव्यावर हजर राहत होते व कामाची वेळ संपल्यानंतर सामनेवाला महामंडळाच्या एस.टी. बसमधुन आपल्या घरी परत जात होते. परंतु, सदरील गोष्टी अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये अथवा पुराव्याच्या शपथपत्रामध्ये नमुद केलेल्या नाहीत. तसेच, सामनेवाला यांचे उलटतपासणीचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदरील गोष्टी सामनेवाला यांनी नाकारल्याचे दिसुन येते. तसेच, सामनेवाला यांचे उलटतपासणीचे अवलोकन केले असता त्यामध्ये सामनेवाला यांनी अर्जदार यांनी विशेष जोखीम स्विकारुन काम केल्याचे मान्य केल्याचे दिसुन येत नाही.

५१. अर्जदार यांच्या नि. क्र. यु—७ वरील उलटतपासणीचे अवलोकन केले असता त्यामध्ये त्यांनी ते सामनेवाला यांच्या विभागीय कार्यशाळेमधील ‘इनडोअर’ काम करणारे कामगार असुन त्यांनी कोविड—१९ कालावधीमध्ये प्रवासी ने आण करणे, प्रवासी सेवा बजावण्याचे काम केलेले नसुन त्यांचा प्रवाशांसी प्रत्यक्ष संबंध आलेला नाही या गोष्टी मान्य केलेल्या असल्याचे दिसुन येते. पुढे त्यांनी त्यांच्या उलटतपासणीमध्ये आर्टिकल ‘अ’ वरील परिपत्रक क्र. ३३/२०२१ हे नि. क्र. सी—७ वरील महामंडळ ठराव क्र. २०२१:७:१८ नुसार दि. ०८/०७/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते व सदरील परिपत्रक क्र. ३३/२०२१ हे विशेष जोखीम पत्करुन प्रवासी सेवा करणा—या महामंडळाच्या कर्मचा—यांनाच लागु आहे या गोष्टी मान्य केलेल्या आहेत. त्यामुळे, अर्जदार यांनी कोरोना कालावधीमध्ये विशेष जोखीम स्विकारुन प्रवासी सेवा बजावली नसल्याचे सिध्द होते. नि. क्र. सी—७ वरील ठरावाअन्वये

व आर्टिकल 'अ' वरील परिपत्रक क्र. ३३/२०२१ नुसार कोरोना कालावधीमध्ये सामनेवाला महामंडळाच्या ज्या कर्मचा—यांनी विशेष जोखीम स्विकारुन अत्यावश्यक सेवा बजावली त्यांनाच सदरील विशेष प्रोत्साहन भत्ता रु. ३००/— लागु करण्यात आल्याचे दिसुन येते. परंतु, अर्जदार यांचे मुळ अर्जाचे व पुराव्याचे शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यांनी त्यामध्ये कोरोना कालावधीमध्ये विशेष जोखीम स्विकारुन अत्यावश्यक प्रवासी सेवा केल्याचे कोठेही नमुद केले नसल्याचे दिसुन येते. तसेच, वर नमुद केल्याप्रमाणे कोरोना कालावधीमध्ये त्यांनी सामनेवाला महामंडळामध्ये इनडोअर कामगार म्हणुन काम केल्याचे व प्रवासी सेवा बजावली नसल्याचे मान्य केले असल्यामुळे परिपत्रक क्र. ३३/२०२१ अर्जदार यांना लागु होत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र. ५ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

५२. सामनेवाला यांच्या कथनानुसार अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये विशेष प्रोत्साहन भत्त्याची मागणी केली आहे. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील परिशिष्ट — २ मध्ये कामगार न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रामध्ये येणा—या गोष्टींची यादी व परिशिष्ट — ३ मध्ये मे. औद्योगिक न्यायालय यांच्या कार्यक्षेत्रामध्ये येणा—या गोष्टींची यादी नमुद केलेली आहे. सदरील कायद्याच्या परिशिष्ट — ३ मधील यादीमध्ये अ. क्र. २ मध्ये इतर भत्त्यांची मागणी मे. औद्योगिक न्यायालय यांच्याकडे अर्ज दाखल करुन मागता येते असे नमुद केलेले आहे. परिशिष्ट — २ मध्ये कोठेही सदरील कायद्यानुसार भत्ते मिळणेसाठी कामगार न्यायालयाकडे अर्ज करता येतो असे नमुद नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज चालविण्याचे अधिकारक्षेत्र प्रस्तुत न्यायालयास नाही. प्रस्तुतचा अर्ज मे. औद्योगिक न्यायालय यांच्यासमोर दाखल होवुन मंजुर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी (Execution) प्रस्तुत न्यायालयास करण्याचे अधिकारक्षेत्र आहे.

५३. निश्चीतच, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील परिशिष्ट — २ व परिशिष्ट — ३ याचे अवलोकन केल्यानंतर सदरील कायद्यान्वये भत्ते मिळणेसाठीचा अर्ज दाखल करुन घेण्याचे अधिकारक्षेत्र मे. औद्योगिक न्यायालय यांना असल्याचे दिसुन येते. निश्चीतच, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ चे कलम ३३ — सी (२) नुसार कामगार न्यायालय हे केवळ Executing कोर्ट आहे. त्यामुळे, सदरील कलमान्वयेचा अर्ज दाखल करण्याचा पुर्वनिर्मित हक्क (Pre-existing Right) असल्यास सदरील कलमान्वये अर्ज दाखल करण्याचा अधिकार अर्जदार यांना असतो. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी त्यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचा पुर्वनिर्मित हक्क (Pre-existing Right) असल्याचे शाबित केले नसल्यामुळे वर नमुद **जगन्नाथ बारिक व इतर** या न्यायनिर्णयामध्ये नामदार ओरिसा उच्च न्यायालय यांनी निरीक्षण नोंदविल्याप्रमाणे प्रस्तुतचा विशेष प्रोत्साहन भत्ता मिळणेसाठीचा अर्ज दाखल करण्याचे अधिकारक्षेत्र वर नमुद कायद्याच्या परिशिष्ट —३ नुसार मे. औद्योगिक न्यायालय यांना आहे. परिणामी, प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र असल्याचे अर्जदार यांनी शाबीत केलेले नाही. त्यामुळे, मुद्दा क्र. ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येते.

## मुद्दा क्र. ६ ते ९ बाबतः—

५४. मुद्दा क्र. ६ ते ९ हे परस्परांशी संबंधित असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची चर्चा एकत्रीत करण्यात आली.

५५. मुद्दा क्र. १, ४ आणि ५ अर्जदार यांनी सिध्द केले नसल्यामुळे अर्जदार हे सामनेवाला यांच्याकडुन दि. ०८/०५/२०२० ते ३१/१२/२०२० या कोविड—१९ महामारीच्या कालावधीत काम केल्याबाबत रु. ३५,१००/— दि. ०३/०६/२०२२ पासुन रक्कम वसुलीपर्यंत द.सा.द.शे. १५ टक्के व्याजासह मिळणेस पात्र नाहीत. त्यामुळे, मुद्दा क्र. ६ ते ८ चे उत्तर

नकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र. ९ च्या उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो :—

—:: **आ दे श** ::—

१. अर्ज नि. क्र. यु—१ नामंजुर करण्यात येतो.

२. दोन्ही बाजुंनी आपआपला खर्च सोसावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषित केला)

SHAHIN VASIM INAMDAR Digitally signed by SHAHIN VASIM INAMDAR Date: 2024.06.01 12:06:11 +0530

(एस. व्ही. इनामदार),
पिठासीन अधिकारी तथा न्यायाधीश,
कामगार न्यायालय, रत्नागिरी.

दिनांक :— ०१/०६/२०२४.

| | |
|---|---|
| युक्तीवाद केल्याची तारीख | ०१/०६/२०२४. |
| निकाल श्रुतलेखन केल्याची तारीख | ०१/०६/२०२४. |
| निकाल प्रतिलेखन केल्याची तारीख | ०१/०६/२०२४. |
| निकाल तपासलेची व सही केल्याची तारीख | ०१/०६/२०२४. |